CMYK





अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com — बुधवार दि. ७ डिसेंबर २०२२ — वर्ष : २१ वे — अंक : ७१ वा — किंमत : ५ रुपये — पाने ८


## आज भारत–बांगलादेश दुसरी वन–डे मॅच



**ढाका** : भारतीय क्रिकेट संघ सध्या बांगलादेश दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात भारत तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामने खेळणार आहे. दरम्यान एकदिवसीय मालिकेला ४ डिसेंबरला सुरुवात झाली असून पहिल्याच सामन्यात भारताला एका विकेटने पराभव स्वीकारावा लागला. अगदी रोमहर्षक अशा सामन्यात भारताचा अवघ्या एका विकेटने पराभव झाला. बांगलादेशच्या मेहदी हसनने उत्कृष्ट खेळी करत मुस्तफिजूरसोबत मिळून शेवटच्या विकेटसाठी अर्धशतकी भागिदारी करत सामना बांगलादेशसाठी जिंकला. आता दुसरा एकदिवसी सामना खेळवला जाणार आहे.

# कर्नाटकदल्ली व्हडीबडी, महाराष्ट्रात चिडाचिडी

## फडणवीसांचा फोन, पवारांचा इशारा, ठाकरेंचा आरोप

**सुराज्य/सोलापूर**

**कर्नाटकाने कुरापत काढून महाराष्ट्रातील जत तालुका आणि अक्कलकोट व दक्षिण सोलापूरसह सोलापूर शहरावर दावा सांगितल्यानंतर गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कर्नाटक–महाराष्ट्र सीमावादाने पुन्हा एकदा डोके वर काढले. त्यावरून दोन्हीकडून आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी सुरू असतानाच मंगळवारी कर्नाटकातील सीमाभागात महाराष्ट्राच्या वाहनांवर हल्ला करण्यात आला. 'कर्नाटकदल्ली व्हडीबडी' ( कर्नाटकात तोडफोड) झाल्यानंतर महाराष्ट्रात मात्र चिडाचिडी सुरू झाली. उपमुख्यमंत्री फडणवीसांनी कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना फोन करून नाराजी व्यक्त केली. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी थेट कर्नाटक सरकारलाच इशारा दिला असून ठाकरे गटाने राज्य सरकारवर आरोप डागले आहेत.**

बेळगाव परिसरातील हिरेबागेवाडी या सीमावर्ती भागात मंगळवारी महाराष्ट्रातील वाहनांवर कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. त्यानंतर महाराष्ट्रातील असंतोषाने उग्र रूप धारण केले आहे. या घटनेनंतर पुण्यातील स्वारगेट एस.टी. स्थानकामध्येही कर्नाटकाच्या गाड्यावर ठाकरे गटाकडून 'जय महाराष्ट्र' अशी रंगरंगोटी करण्यात आली आहे. आता कर्नाटकविरोधात राजकीय वातावरण तापू लागले आहे.



### 'अरे'ला 'कारे' करावेच लागेल : अजित पवार



मराठीभाषीक बेळगाव भागात महाराष्ट्राच्या गाड्यांवर कन्नड गुंडांनी केलेल्या हल्ला हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानावरचा हल्ला आहे. असे भ्याड हल्ले महाराष्ट्र सरकारने खपवून घेऊ नयेत. महाराष्ट्र सरकार आणि सत्तारूढ पक्षांनी नेभळटपणा, बोटचेपी भूमिका सोडावी. निव्वळ निषेध करून चालणार नाही. 'अरे' ला 'कारे' म्हणण्याची हिम्मत महाराष्ट्र सरकारने दाखवावी, असे आवाहन विरोधी पक्षनेते अजित पवारांनी केले आहे.

### फडणवीस बोलले बोम्मईंशी



'मी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांशी बोललो, नाराजी, चिंता आणि अपेक्षा व्यक्त केली की, तत्काळ यावर कारवाई झाली पाहिजे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी मला आश्वस्त केलं, की तत्काळ कारवाई केली जाईल आणि जे लोक अशाप्रकारच्या घटना करत आहेत, त्यांच्यावर सरकार कारवाई करेल. आता त्यांनी जे काही सांगितलेलं आहे, त्याकडे आम्ही लक्ष ठेवून आहोत. पण याचसोबत हा संपूर्ण विषय मी स्वत: देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याही कानावर टाकणार आहे.

### पवारांकडून ४८ तासांची मुदत



पुढील २४ तासांत परिस्थिती निवळली पाहिजे. नाहीतर कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई यासाठी जबाबदारी राहतील. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून चिथावणीखोर भूमिका जर घडत असेल, तर देशाच्या स्थैर्याला मोठा धक्का असेल. केंद्र सरकारने बघ्याची भूमिका घेऊन चालणार नाही. येत्या ४८ तासांत हे प्रकरण संपले नाही, तर माझ्यासकट सर्वांना बेळगावात तेथील लोकांना धीर देण्यासाठी जावं लागेल, अशा इशारा राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी कर्नाटकाला दिला आहे.

### मलाच कर्नाटकात जावे लागेल : छ. संभाजी



छत्रपती शिवरायांचे चित्र असलेल्या वाहनांची कन्नडीगांनी केलेली तोडफोड निषेधार्ह असून महाराष्ट्रात त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल. रेणुकादेवी यात्रेनिमित्त कोल्हापुरातील लाखो भाविक कर्नाटकातील सौंदत्ती येथे गेले आहेत,त्यांची सुरक्षा कर्नाटक सरकारने करावी, अन्यथा वेळप्रसंगी मला स्वत:लाच कर्नाटकात यावे लागेल, असा इशारा छत्रपती संभाजीराजेंनी कोल्हापुरात कर्नाटक सरकारला दिला आहे.

### महाराष्ट्रात हतबल सरकार : आदित्य ठाकरे



'आता आपल्या महाराष्ट्राची गावं दुसऱ्या राज्यात पळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण, घटनाबाह्य मुख्यमंत्री मात्र ह्या सगळ्यावर गप्प का? स्वत: साठी दुसऱ्या राज्यात पळून गेले, पण महाराष्ट्रासाठी बेळगावला जात नाहीत? राग ह्या गोष्टीचा येतो की, खरंतर जो विषय चर्चेचा नाही त्यावर चर्चा करायला निघाले होते, पण कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी दम देताच आपले मंत्री घाबरून तिथे गेलेच नाहीत. एवढं हतबल सरकार महाराष्ट्रात कधीच नव्हतं!' असे ट्विट शिवसेनेच्या ठाकरे गटाचे आ. आदित्य ठाकरेंनी केले आहे.

## शासनाचे वाड्:यम पुरस्कार जाहीर

**मुंबई** : शासनाकडून दिले जाणारे वाड्:मय पुरस्कार मंगळवारी जाहीर करण्यात आले. शासनाकडून ३५ विभागात हे पुरस्कार दिले जातात. २०२१ मध्ये यातील दोन विभागांसाठी शिफारशी आल्या नव्हत्या. त्यामुळे केवळ ३३ विभागांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. रोख रक्कम १ लाख रुपये किंवा ५० हजार रुपये, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र, असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाड्:मय निर्मितीसाठी स्व.यशवंतराव चव्हाण वाड्:मय पुरस्कार दिले जातात.

## कुंभारी विडी घरकुलातील विदेशी गेलेल्या पत्नीला बोलावून घ्या म्हणत सासूवर चाकू हल्ला

### कुंभारी विडी घरकुल येथे रात्रीची घटना

**सुराज्य/सोलापूर**

आखाती देशात पाठविलेला पत्नीला बोलावून का घेत नाही? या कारणावरून जावयाने सासूला चाकूने वार करून गंभीर जखमी केले. ही घटना कुंभारी (ता.दक्षिण सोलापूर) येथील विडी घरकुल परिसरात सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

या प्रकरणात पोलिसांनी जखमीच्या जावयाला अटक केली. त्याला ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने मंगळवारी दिला आहे. शहनाज इलियाज कोरबू (वय ४७ रा. कुंभारी घरकुल) असे जखमी झालेल्या सासूचे नाव आहे. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या संदर्भात जखमीचा मुलगा कादर इलियास कोरबू यांनी वळसंग पोलिसात फिर्याद दाखल केली.




त्याप्रमाणे पोलिसांनी हुसेन कमरोद्दिन शेख (वय ३२ रा. सत्तरफूट रोड, इंदिरानगर सोलापूर) याला अटक केली. त्याला ९ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. आरोपी हुसेन शेख याची पत्नी सुमय्या ही तीन आठवड्यापूर्वी मुले आणि पतीला सोलापुरात ठेवून कुवेत येथे नोकरीसाठी गेली होती. पत्नी विदेशी गेल्यानंतर मुले निराश झाली होती. त्यामुळे तो पत्नीला परत बोलावून घ्या. असे सासूला म्हणाला होता. मात्र सासूने नकार दिला. त्यामुळे हुसेन शेख (जावई) याने चाकूने सपासप वार करून सासूला जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार उस्मान शेख करीत आहेत.

## सावरकरांनी एकदा नाही तर पाचवेळा माफी मागितली : डॉ.ढवळे

**सुराज्य/सोलापूर**

राहुल गांधी हे तर आत्ता बोलून गेले मात्र सावरकर यांच्या बाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका कायम तीच आहे. अंदमानच्या तुरुंगात असताना सावरकर यांनी एक नव्हे तर पाच वेळा माफीनामा लिहून दिला आहे, असे प्रतिपादन माकपचे पॉलिटब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे यांनी केले.

सोलापुरात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची राज्य कमिटीची विशेष बैठक होत आहे. यावेळी पक्षाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या पत्रकार परिषदेस पॉलिटब्युरो सदस्य डॉ. अशोक ढवळे बोलत होते. ते पुढे म्हणाले, अंदमानच्या तुरुंगात असताना सावरकर यांनी एक नव्हे तर पाच वेळा माफीनामा लिहून दिला आहे. त्यामुळे त्यांना इंग्रजांनी १९२३ मध्ये सोडून दिले नंतरच्या चोवीस वर्षात सावरकर यांनी इंग्रजा विरोधात एकही करंगळी उचलली असेल तर मला सांगा हे माझे सर्वांना चॅलेंज आहे. अंदमानच्या तुरुंगात अनेक लाल बावट्याचे नेते गेले होते. मात्र त्यांना कधी माफी मागितली नाही, असेही ते म्हणाले.



यावेळी माजी खासदार कॉ.निलोत्पल बसू, माकपचे राज्य सचिव उदय नारकर यांनी केंद्र आणि राज्य सरकारविरुद्ध टिका केली. या पत्रकार परिषदेला आमदार विनोद निकोले, कॉ. नरसय्या आडम मास्तर ॲड.एम एच. शेख हे उपस्थित होते.

## पंढरपूर येथे तरुणास पळवून नेऊन खुनाचा प्रयत्न; ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर** : पूर्वीच्या भांडणावरून एका १९ वर्षीय तरुणाला पळवून नेऊन त्याला कोयत्याची मुठी, काठी आणि लोखंडी पंचने मारून गंभीर जखमी करण्यात आले.

ही घटना पंढरपूर शहरातील आयटीआय कॉलेजच्या पाठीमागे रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणात पंढरपूर शहराच्या पोलिसांनी ७ जणाविरुद्ध पळवून नेऊन खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. सोहम काळू पवार (वय १९ रा.पद्मावती विस्थापित नगर पंढरपूर) याने पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी गंगाधर ऊर्फ पिल्लूया नागनाथ बंदपट्टे, आकाश ऊर्फ अक्षय बंदपट्टे, संजय धोत्रे, रवी बंदपट्टे,देवा बंदपट्टे, सुरज ऊर्फ भैय्या पवार आणि रोहन बंदपट्टे (सर्व रा. म.फुले चौक पंढरपूर) अशा ७ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. जखमी सोहम पवार यांच्या भावासोबत आरोपी बरोबर भांडण झाले होते. त्याचा राग धरून रविवारी दुपारच्या सुमारास आरोपींनी सोहमला त्याच्या घरातून बळजबरीने दुचाकी वरून कासेगाव रोडवरील आयटीआय कॉलेज जवळ नेले. आणि त्याला बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. त्यावेळी सोहमचे आई-वडील आले असता त्यांना देखील आरोपींनी लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक सोनवलकर पुढील तपास करीत आहेत .

ट्रक हवेत....



चालकाचा ताबा सुटल्याने ट्रक दुभाजकावर चढल्यामुळे सोलापुरात विमानसेवा जमिनीवर तर ट्रक हवेत असे कोट सोशल मिडीयात व्हायरल झाले.

## डिकसळ येथे अवैध वाळूसाठा, एकावर गुन्हा दाखल

**सुराज्य/मोहोळ**

डिकसळ येथे भोगावती नदी किनारी पाच लाखाचा ९७ ब्रास वाळू साठा केलेला आढळून आल्याने संबंधितावर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना ६ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली.

डीकसळ येथील तलाठी उद्धव शेटीबा कांबळे हे ऑफिसला जाणेसाठी निघाले असता त्यांना भोगावती नदी पात्रच्या कडेला एका शेतात अवैध रित्या वाळू साठा करून ठेवलेला त्यांना दिसून आला. त्यांनी त्या गावातील कोतवाल यांचे कडून चौकशी केली असता ती शेती गणेश रावसाहेब मोटे शेती गट नं ४ ३२/१० असून सदर वाळू साठा गणेश रावसाहेब मोटे यांचा असल्याची खात्री करून घेतली सदर वाळू साठा ९७ ब्रास असून त्याची किंमत अंदाजे किंमत ४ लाख ८५ हजार रुपये आहे म्हणून या अवैध उपसा करून ठेवले बद्दल मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पो.ना सत्यवान जाधव करत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नाकातोंडापर्यंत येणे, म्हणजे खुर्ची पर्यंत येणे !

| कल्याण |
|---|
| -------- |

| मेन बाजार |
|---|
| -------- |

## ग्रामपंचायत निवडणूक : सरपंचपदाचे १६ तर सदस्यत्वाचे ८४ अर्ज नामंजूर

### आज अंतिम चित्र स्पष्ट होणार

**सुराज्य/सोलापूर**

**जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून दाखल उमेदवारी अर्जांची छाननी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. या छाननीत सरपंचपदाचे १६ तर सदस्यपदासाठीचे ८४ उमेदवारी अर्ज नामंजूर करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.**



दरम्यान, बुधवारी दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार असून माघारीनंतरच निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सरपंचपदाकरिता १ हजार ६९ व सदस्यपदासाठी ५ हजार ८८९ इच्छुकांनी उमेदवारी दाखल केले होते. निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामपंचायतींसाठी काँग्रेसचे नेते सुरेश हसापुरे यांचे पुत्र श्रीदीप व चन्नप्पा बोरगी हे सरपंचपदाचे उमेदवार आहेत. बोरगी यांच्या अर्जावर बसवराज माळगे यांनी आक्षेप घेतला. त्यामुळे भाजपच्या गोटामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. रात्री उशिरापर्यंत दोन्ही बाजूंकडून कायद्याचा किस पाडण्याचे काम सुरू होते. जिल्ह्यात अवैध ठरलेल्या सरपंचपदाचे सर्वाधिक चार इच्छुक मंगळवेढा व माळशिरस तालुक्यातील आहेत. दक्षिण सोलापूरमधील ३ व बार्शी येथील दोघा इच्छुकांचाही अपात्र उमेदवारांमध्ये समावेश आहे.

**तालुकानिहाय नामंजूर झालेले अर्ज**

| तालुका | सरपंच | उपसरपंच |
|---|---|---|
| करमाळा | ०० | ०८ |
| माढा | ०० | ०३ |
| बार्शी | ०२ | ०२ |
| उत्तर सोलापूर | ०१ | ०५ |
| मोहोळ | ०० | ०६ |
| पंढरपूर | ०१ | ०२ |
| माळशिरस | ०४ | १४ |
| सांगोला | ०० | ०० |
| मंगळवेढा | ०४ | २२ |
| दक्षिण सोलापूर | ०३ | १८ |
| अक्कलकोट | ०१ | ०४ |

CMYK